For Private Circulation Only

RAYAT SHIKSHAN SANSTHA, SATARA 1919-2019 Centenary

Estd.: 1965 Rayat Shikshan Sanstha's (Maharashtra)

# DAHIWADI COLLEGE DAHIWADI

# DCD TIMES

Affiliated to Shivaji University, Kolhapur

Phone : 02165 - 220231 Fax : 02165 - 220231
Email : dcdprincipal@gmail.com

NAAC Third Cycle Reaccreditation : 'A' Grade with CGPA 3.25

NEWSLETTER
MARCH TO MAY 2019
VOLUME 2, ISSUE 4

**Publisher : Principal, Dr. B. T. Jadhav** **Editor : Dr. K. M. Pawar**

## प्राचार्यांचे मनोगत

मार्च ते मे हा प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षेचा प्रभाव असणारा कालखंड. महाविद्यालयातील अध्यापनाचे, व्याख्यानांचे, शिबीरांचे, बहुतेक स्पर्धा-सोहळ्याचे आयोजन यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतरच्या कालावधीतील हा DCD TIMES चा अंक. या काळात महाविद्यालयाने विद्यार्थी व शिक्षकांसाठी आयोजिलेल्या चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षणे, विद्यार्थी निरोप-शुभचिंतन कार्यक्रम या बरोबरच महाविद्यालयास प्राप्त अनुदान, महाविद्यालयास देणगी मिळालेल्या जागेत खोदलेल्या विहीरीद्वारे झालेला पाणी पुरवठा निश्चित अभिमानास्पद अन् आनंददायी व उल्लेखनीय. यात सहाय्यभूत सर्व घटकांचे, विद्यार्थ्यांचे, देणगीदारांचे व सहकाऱ्यांचे आभार आणि अभिनंदन !

– प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव

## संपादकीय

अध्यापन व शैक्षणिक कार्यपूर्तता व प्रात्यक्षिक तसेच लेखी परीक्षेचा कालावधी म्हणजेच सत्र समाप्तीकडे झुकलेल्या काळाचा मागोवा यातील घटना, कार्यक्रमांचा आढावा घेताना अंक पूर्ण होण्याची चिंता होती. त्यामुळे समित्यांसह माहिती मागवली आणि अनुभव उत्साहवर्धक आला. प्राचार्यांचे याकाळातील नियोजन वैविध्यपूर्ण बातम्यांनी समोर आले. यातील महत्त्वपूर्ण उल्लेखनीय बातम्या प्रकाशित करताना मनस्वी आनंद होत आहे. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालय यापुढेही सार्थ प्रगतीची वाटचाल करत राहील. सर्वांचे आभार, धन्यवाद !

– संपादक : डॉ. के. एम. पवार




## प्राचार्य डॉ.बी.टी. जाधव यांना गुणी निष्ठावान रयत सेवक पुरस्कार

रयत शिक्षण संस्थेचा माजी प्राचार्य एन. आर. माने निष्ठावान गुणी रयत सेवक पुरस्कार प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांना सातारा येथील समारंभात प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, परिषदांमधून त्यांचे अनेक शोधनिबंध प्रसिध्द झाले असून त्यांनी संशोधन क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे. त्यांची पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अभ्यास मंडळावर कुलगुरू नियुक्त सदस्य पदी निवड झालेली आहे. पुरस्काराबद्दल संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील व सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत महाविद्यालयातील प्राध्यापक, सेवक, विद्यार्थी, स्थानिक व्यवस्थापन समिती व माजी विद्यार्थी संघाने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.



## दहिवडी कॉलेजला रयत शिक्षण संस्थेचा इनोवेटीव्ह कॉलेज पुरस्कार

दहिवडी कॉलेजला रयत शिक्षण संस्थेचा यावर्षीचा इनोवेटीव्ह कॉलेज पुरस्कार नुकताच प्राप्त झाला. रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील समारंभात मा. डॉ. अनिल पाटील साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेतील सर्व महाविद्यालयापैकी या वर्षीचे इनोवेटीव्ह कॉलेज म्हणून संस्थेत या कॉलेजची दखल घेण्यात आली आहे.पुरस्काराबद्दल संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत महाविद्यालयातील प्राध्यापक, सेवक, विद्यार्थी स्थानिक व्यवस्थापन समिती व माजी विद्यार्थी संघाने त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

## डॉ. देवानंद सोनटक्के यांची शिवाजी महाविद्यालयाच्या अभ्यासमंडळावर निवड



महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. देवानंद सोनटक्के यांची रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी महाविद्यालयाच्या अभ्यासमंडळाच्या उपसमितीवर निवड झालेली आहे. संस्थेच्या या महाविद्यालयाला युजीसीचा स्वायत्त महाविद्यालय हा दर्जा नुकताच मिळाला असून येत्या शैक्षणिक सत्रापासूनच्या नवीन अभ्यासक्रमासाठी बी.ए.भाग.१ व एम.ए.भाग.१ च्या सुधारित अभ्याक्रमासाठी त्यांची ही निवड करण्यात आली आहे. डॉ. देवानंद सोनटक्के यांचे चार समीक्षाग्रंथ प्रसिध्द असून ५४ शोधनिबंध व लेख प्रसिध्द आहेत. यापूर्वी त्यांनी शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या अभ्यासमंडळावर उपसमिती सदस्य म्हणून काम केले आहे.




## अद्वैत नियतकालिकाचे प्रकाशन

दहिवडी कॉलेजच्या अद्वैत नियतकालिक २०१८-१९ या अंकाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, साताराचे प्राचार्य डॉ. के. जी कानडे यांच्या हस्ते झाले. 'महाविद्यालयाच्या वर्षभराच्या कामगिरीचा आरसा म्हणजे महाविद्यालयाचा अंक असतो, हा अंक सर्वांगसुंदर झाला आहे' असे मत याप्रसंगी प्राचार्य कानडे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी. जाधव यांनी सर्वांचे कौतुक केले. या अंकाचे प्रमुख संपादक डॉ. देवानंद सोनटक्के यांनी प्रास्ताविक केले. आभार डॉ. एस.एम.खेत्रे यांनी मानले. या अंकाचे विभागीय संपादक म्हणून डॉ. सुलोचना वाघमोडे, डॉ. के. एम पवार, डॉ.एन डी. लोखंडे, श्री. एम.  बी. शिकलगार, श्री. पी. के. टोणे यांनी काम पाहिले.

## AAA

As per the sanstha decision AAA Committee visited the college on 11th april 2019. The committee was led by Dr. P. S. Gaikwad, principal, D G College of Commerce, Satara. Dr. S. S. Pawar, Principal, Ismail Saheb Law College, Satara, worked as a member of the committee and Mr. Y. N. Desai, Coordinator, IQAC, Ismail Saheb Law College, Satara as the coordinator of the Committee. The committee assessed the whole document of the academic year 2018-19. Prin Dr. B. T. Jadhav welcomed the peers and Dr. S M Khetre assisted the committee whereas Dr. A.N. Dadas expressed gratitude towards the peers.



## One Day Workshop on NIRF



One day workshop on National Institutional Ranking Framework (NIRF) was organized By IQAC on 2th March, 2019. The function was inaugurated by Prof Dr. D. D. Namdas, NIRF Coordinator, YCIS , satara. Dr. P. B. Buchade, Principal, Abasaheb Garware College, Pune was present as a Resoure Person, Second session was conducted by Dr. M. L. Dongare, IQAC Coordinator, S M Joshi College Hadpsar. Prin Dr. B. T. Jadhav Introduced The function & Dr. A. N. Dadas expressed vote of thanks. Totally 76 Participants participated in this workshop. The workshop proved a grand success with the help of IQAC members like Dr. B. S. Balwant, Dr. A. N. Dadas, Dr. S. M. Khetre, Dr. V. P. Gaikwad, Dr. A. U. Chopade, Mr. V. V. Kamble, Mr. V. S. Patole, Mr. M. B. Shikalgar & Mr. A. H. Kolekar And All the teaching and non-teaching staff of the college and all the participants from various colleges.

## Workshop on e- Content Development



ग्रंथालय व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने e-Content Development विषयावर राज्यस्तरीय एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. उद्घाटक प्रा. अभिजीत माने व तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. उमेश शेळके, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,रामानंदनगर यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी व्यक्त केले. पहिल्या सत्रामध्ये प्रा. अभिजीत माने यांनी Google Slides, Power Point Presentation, DU Recorder, Cinema FV5 Lite यांचा शिकवताना वापर कसा करावा याचे प्रात्याक्षिक सादर केले. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. उमेश शेळके यांनी DU Recorder संबंधी प्रात्याक्षिकसह मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये प्रा.अमोल कोळेकर यांनी Lecture capturing संबंधी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सादर केले. समारोप सत्रामध्ये प्रा. साहेबराव, अन्नापुरे, राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध यांनी e - Resoures संदर्भात मार्गदर्शन केले. समारोपीय मनोगत उपप्राचार्य डॉ. बळवंत बी. एस. यांनी व आभार ग्रंथपाल श्री वाघेरे व्ही. एस. यांनी व्यक्त केले.

## Workshop om IPR



Department Of Chemistry & IQAC has organized "One Day State Level workshop on "**Intellectual Property Rights"** (IPR) It was inaugurated By Hon. Gorakh Taware, Shahu Highschool, Baramati. The Second lecture was deliverd by Dr. Ankita Nagarkar, Pune. Hon. Prin. Dr. B T. Jadhav, Chief Organizer of the workshop motivated, guided and supported to all for the grand success of the workshop. Dr. A N Dadas inrtoduced the function & Dr. S M Khetre proposed vote of thanks.



## महिला उद्योजिका प्रशिक्षण

दहिवडी कॉलेज व माणदेशी फाऊंडेशन, म्हसवड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा ११ एप्रिल २०१९ रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे प्रा. उदय लोखंडे व मार्गदर्शक मा. सौ. कोंडलेकर, व्यवस्थापक माणदेशी महिला बँक, म्हसवड, सौ. स्वाती कदम,माधुरी तोरणे व नम्रता जाधव यांनी व्यावसायिक क्षमता, निर्मिती, आत्मविश्वास , आर्थिक व्यवस्थापन, भांडवल निर्मिती, बचतीचे प्रकार, विविध योजना या विषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेचा लाभ ६० महिलांनी घेतला.



## माझी आई माझ्या कॉलेजात

महिला दिनाचे औचित्य साधून **'माझी आई माझ्या कॉलेजात'** हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुण्या सौ. वनिता पिसे यांनी सामान्य गृहिणी ते यशस्वी उद्योजिका हा प्रवास कथन केला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सौ. साधना गुंडगे, नगराध्यक्षा, दहिवडी यांनी महिलांना आत्मनिर्भर व स्वावलंबी होण्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थिनी व त्यांच्या प्रेरक मातांचा व विशेष महिला शिक्षक म्हणून सौ. माने एस. बी. यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांनी उपस्थितांना निर्भयतेने आत्मसंरक्षण करण्याचे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सौ. मदने यू. एस., सूत्र संचालन कु. हुलवान ए. आर. व ऋतुजा कुंभार यांनी तर आभार श्री. पी. के. टोणे यांनी व्यक्त केले.

## बांधकाम समिती





* बांधकाम समिती मार्फत महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्र, विस्तारीत कँटीन पत्राशेड, विस्तारीत ग्रंथालयावर रीडिंग हॉल, लेक्चर हॉल B Voc प्रयोगशाळा व संस्था शताब्दी महोत्सवानिमित्त देणगी स्वरूपात मिळालेल्या जमिनीमध्ये विहिर इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली.

## पदवीप्रदान सोहळा



दि. १५ मार्च रोजी सांस्कृतिक सभागृहात पदवीप्रदान सोहळा थाटात संपन्न झाला. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, विद्यापीठ प्रतिनिधी श्री.अमित कुलकर्णी, सदस्य, व्यस्थापन परिषद व प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव सोहळ्याचे अध्यक्ष होते. पदवीप्राप्त विद्यार्थी, पाहुणे, प्राचार्य, परीक्षा अधिकारी, विद्यार्थी सचिव हे प्रवेशद्वारापासून सोहळास्थळी मिरवणूकीने आले. प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलनानंतर स्वागत व प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. बी.एस.बलवंत यांनी केले. श्री. अमित कुलकर्णी, प्राचार्य डॉ. कराळे साहेब, ॲड. श्री. भास्करराव गुंडगे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. पदवीप्राप्त विद्यार्थीयादी वाचन डॉ.बरकडे ए. जे यांनी केले. विद्यार्थ्यांना याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. अध्यक्षीय मनोगत मा.प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी व आभार डॉ. लुबाळ एम. जे. यांनी व्यक्त केले. राष्ट्रगीतानंतर सोहळ्याची सांगता मिरवणूकीने झाली.

## रिसेंट ट्रेंडस इन इकॉनॉमिक्स, कॉमर्स अँड मॅनेजमेंट : राष्ट्रीय चर्चासत्र



दि. ०६/०३/२०१९ रोजी प्राचार्य डॉ.बी.टी. जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र व वाणिज्य विभागातर्फे **रिसेंट ट्रेंडस इन इकॉनॉमिक्स, कॉमर्स अँड मॅनेजमेंट** या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. बी. बावधनकर, डॉ. व्ही. एम. कुंभार, डॉ. एस. एम. कांबळे यांनी पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. डॉ. बी. एच. जंगले यांनी 'बँकिंग क्षेत्रातील सुधारणा',डॉ. एम.जी. थोपटे यांनी 'चलनविषयक धोरणातील नवीन प्रवृत्ती' तर डॉ. डी. एस. बागडे यांनी 'भारतीय अर्थव्यवस्थेतील आव्हाने आणि भवितव्य' मार्गदर्शन केले.

## स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस

### सन २०१८-१९ या वर्षात स्किल डेव्हलपमेंट कोर्ससाठी एकूण ४६७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला

| अ.नं. | सामंजस्य करार संस्था/कंपन्या | कोर्सची संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | रयत स्किल फौंडेशन | १० | २०९ |
| २ | BOSCH | १ | ५० |
| ३ | गांधी रिसर्च फौंडेशन | १ | ३० |
| ४ | FALI | ४ | ६६ |
| ५ | B.V.G. INDIA LTD | ४ | ६७ |
| ६ | Jain Irrigation Ltd Jalgaon | २ | ४५ |
| | एकूण | २२ | ४६७ |

## रयत माऊली : ८९ वी पुण्यतिथी

रयत शिक्षण संस्थेच्या, दहिवडी येथील रयत शैक्षणिक संकुलाच्या वतीने रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील ऊर्फ ती. वहिनी यांची ८९ वी पुण्यतिथी शुक्रवार दि. ५ एप्रिल २०१९ रोजी दहिवडी कॉलेज, दहिवडी येथे संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या मा. डॉ.सौ. वंदना जाधव (प्राचार्या, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा) प्रमुख मार्गदर्शिका मा. सौ. इंद्रजिता चव्हाण (मुख्याध्यापिका, शेठ परशुराम महादेव शिंदे कन्या विद्यालय, दहिवडी) कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. वाघोजीराव पोळ (सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा) व प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.




## वृक्षसंपदेचे संगोपन

मार्च महिन्यापासून महाविद्यालयामध्ये पाणी टंचाई तीव्र झाली. मा. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार टँकरने पाणी देवून वृक्षसंपदेचे संगोपन करण्यासाठी कॉलेज परिसर सुशोभीकरण समितीद्वारे आटोकाट प्रयत्न करण्यात आले. बॉटनिकल गार्डन, शेड नेट्स आणि पॉली हाऊस यांचीही देखभाल करण्यात आली.

## उत्सुकता पेटी

विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक शंकांचे निरसन करण्यासाठी महाविद्यालयामध्ये विज्ञान मंडळ समितीमार्फत उत्सुकता पेटी ठेवण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांकडून त्यांचे वैज्ञानिक प्रश्न व शंकांसंबंधी स्लीपवर माहिती घेऊन मार्च व एप्रिल महिन्याच्या पहिल्या सोमवारी ते उघडून, संबंधीत विषयांच्या तज्ञ प्राध्यापकांकडून उत्तरे मिळवून वनस्पतीशास्त्र विभागाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली. प्रत्येक विभागामार्फत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन व Video Films दाखवण्यात आल्या. विविध विषयातील तज्ञ प्राध्यापक बोलावून विद्यार्थ्यांचे मार्गदर्शनपर प्रबोधन केले. राष्ट्रीय विज्ञान दिन १ मार्च रोजी साजरा करण्यात आला.



## सत्र परीक्षा संपन्न

दुसऱ्या सत्रातील बी.ए./बी.एस्सी./बी. कॉम./बी.सी.ए./बी.व्होक या नियमित विद्यार्थ्यांच्या सत्र २, ४, व ६ आणि रिपीटर विद्यार्थांच्या सत्र १, ३, ५ या परीक्षा ७ सत्रांमध्ये झाल्या. बी.ए/बी.कॉम भाग १,२ व ३ या सकाळी १२ ते २ आणि ३ ते ५, बी. एस्सी. भाग १,२ व ३ सकाळी ११ ते २ आणि दुपारी ३ ते ५ या कालवधीत होत्या. एम.ए/एम.एस्सी.भाग १,२ ही परीक्षा सकाळी ११ ते २ व दुपारी ३ ते ५ या वेळेत होती. बी.सी.ए. भाग १,२ व ३ ही परीक्षा १०.३० ते १.३० आणि दुपारी २.३० ते ५.३० या कालवधीत झाली. बी. व्होक भाग १ ही परीक्षा सत्र १ व सत्र २ सकाळी ११ ते १ व दुपारी ३ ते ५ या कालावधीत होती. विद्यापीठीय परीक्षा १२ मार्च ते १२ जून २०१९ या कालावधीत संपन्न झाल्या. या परीक्षांस नियमित व रिपीटर एकूण ८७०९ विद्यार्थी होते.



## मौजे शिंदी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर

राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक केंद्र पुणे, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मुधोजी महाविद्यालय फलटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. १० ते २३ मे दरम्यान मौजे शिंदी खुर्द ता. माण येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये, दहिवडी कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. शिंदे के. एस., उपप्राचार्य डॉ. बलवंत बी.एस. व स्वंयसेवक यांनी सहभाग घेतला.



## शुभचिंतन समारंभ

दि. २३/०३/२०१९ रोजी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'शुभचिंतन समारंभ' आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहणे म्हणून प्राचार्या डॉ. सौ. एम. व्ही. बोबडे, (भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंधगाव, पुणे) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, सदरच्या समारंभास बी.ए., बी.कॉम.,बी.एस्सी.,बी.सी.ए. याशाखेच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव हे उपस्थित होते.



## उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर

दि कर्मवीर क्रीडा अंतर्गत दहिवडी येथील रयत शैक्षणिक संकुलाच्या सर्व शाखामधील खेळाडूंसाठी दि. १०/०४/२०१९ ते २०/०४/२०१९ या काळामध्ये उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिरामध्ये ७५ खेळांडूनी सहभाग घेतला. सदर शिबीरामध्ये हॉलीबॉल, क्रिकेट, बेसबॉल, बॅडमिंटन,ॲथलेटिक्स या खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरासाठी श्री. शिंदे उदय, श्री. अमिर जाधव, श्री. प्रशांत राऊत, काळे ज्ञानेश व लोहकरे यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी शिबिरास मार्गदर्शन केले.



## राज्यशास्त्र विभागाची क्षेत्रभेट

विटभट्टीवरील असंघटित कामगार व त्यांच्या सहा ते चौदा वयोगटातील बालकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी १२ मार्च रोजी फौंडेशन कोर्स इन ह्युमन राईट एज्युकेशन अंर्तगत राजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी विटभट्टीची क्षेत्रभेट केली. यावेळी शालाबाह्य मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून शाळेच्या प्रवाहात दाखल होण्याचे आवाहन केले. यावेळी विभाग प्रमुख श्री. पी. एस. प्रक्षाळे व श्री. एस. आर. धोंगडे उपस्थित होते.

## मा. शरदचंद्रजी पवार साहेबांची महाविद्यालयास भेट



माण तालुक्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या पाहणी दरम्यान रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी दहिवडी महाविद्यालयास अचानक भेट दिली. सोबत रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौसिल सदस्य मा. प्रभाकर देशमुख व मान्यवर होते.

## National Confrence - "Life Science : A Sustainable Development "



Dept of Zoology organized National Confrence On "Life Science : A Sustainable Development " on 28 march, 2019. Chief Guest Prof. Dr. I. K. Pai (Head, Dept of Zoology, Goa University, Goa) President Prin. Dr. B. T. Jadhav, Convener Dr. Lubal M J

## विहिरीसाठी तीन गुंठ्यांची जमीन



विहीरीसाठी जागा दाता<br>सौ. आशालता व शिवाजी पाटणकर



विहीर खोदाई पूजन प्रसंगी प्राचार्य व मान्यवर

दहिवडी महाविद्यालयाच्या पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यास सौ. आशालता शिवाजी पाटणकर यांनी रयत शिक्षण संस्था शताब्दीनिमित्त संस्थेस तीन गुंठे जमीन देणगी स्वरूपात दिली.

## B. Voc. विभागाला विद्यापीठाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीची भेट

दि. २५/०३/२०१९रोजी महाविद्यालयातील B. Voc in Agriculture विभागाच्या दुसऱ्या वर्षाच्या संलग्नतेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीने भेट दिली. या समितीचे चेअरमन मा. प्राचार्य डॉ. डी. डी. करळपकर व सदस्य मा. प्रा. व्ही. बी. शिंपले यांनी विभागाची प्रयोगशाळा, पॉलिहाऊस, बाग इ.ची पाहणी करून शिवाजी विद्यापीठाकडे अहवाल पाठवला.

## Workshop On - Career Opportunities...

Department of Physics organized a workshop on Career opportunities after B.sc. and "Advances In Research" by Dr. Torane A .P. and Mr. Pagare P. K. From Y C I S, Satara under Lead College Activity. In project competition total six students are participated. Miss Shivani Shinde got First Prize in this events. Also her idea was selected for innovation to incubation.

## Bosch Bridge Program

11 Students of bosch bridge program are selected as office assistand at Chhabda College & Engineering at Satara This Course is Successtully ran in Dahiwadi College Since 2017. In the academi year 2018-19 the centre has got tremendous success under the trainership of Dr. K. S. Raut.

## विज्ञान प्रकल्पाचा उपक्रम

विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी एस. एम. जोशी कॉलेज, हडपसरच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोवेशन व इन्क्यूबेशनला भेट दिली. यावेळी सोबत विज्ञान प्रकल्प प्रमुख डॉ. लुबाळ एम. जे., प्रा. कु. पवार एम.डी. हे होते.

## सत्र समाप्ती सभा

दि. १ मे रोजी सकाळी १० वा. सत्र समाप्तीची बैठक महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहामध्ये संपन्न झाली. सभेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांनी केले. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रम व विविध समित्यांमार्फत विद्यार्थी गुणवत्तायुक्त कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा व अंतर्गत मूल्यमापन तसेच इतर झालेली कामे यांचा आढावा विभागप्रमुखांनी सादर केला. यात सर्वप्रथम एन.सी.सी. प्रमुख श्री. टी. एस. माने यांनी एन.सी. सी. मार्फत घेतलेल्या उपक्रमाचा आढावा सादर केला. डॉ. बरकडे यांनी परीक्षा विभाग व गुणवत्ता सुधार कार्यक्रमाद्वारे गुणवत्ता विकसित करण्यासाठी घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. यानंतर परीक्षा विभागीय कामकाजाचा आढावा सादर केला. स्कील कोर्सचे प्रमुख डॉ. व्ही. पी. गायकवाड यांनी एम. पी. एस. सी. व स्कील कोर्सचा व त्यांची कार्यप्रणाली यावर अहवाल सादर केला. डॉ. लुबाळ यांनी विविध कोर्स व विज्ञान विभागांचे एकत्रित अहवाल सादर केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. पी. के. टोणे यांनी सांस्कृतिक मंडळाचा विद्यापीठ स्तरावरील विविध गुणदर्शन व यश यावर अहवाल सादर केला. त्यानंतर आय. क्यु, ए. सी. चे समन्वयक डॉ. ए. एन. दडस यांनी गुणवत्तेशी निगडीत कृती तसेच विभागावर घेतलेल्या कार्यक्रमांचे एकत्रित अहवाल वाचन केले व भविष्यकाळातील योजनेवर प्रकाश टाकला. सभेच्या शेवटी सभेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी सर्व विभागाचे कौतुक केले. तसेच महाविद्यालयाचे ध्येय काय? व आपली गुणवत्ता कशी अबाधित राखली जाईल यावर उद्‌बोधन केले. अध्यापन, अध्ययन,सांस्कृतिक, क्रीडा, संशोधन, मूल्यमापन या अतिशय महत्त्वाच्या बाबी आहेत व यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहायला हवे; असे सांगितले. पर्यवेक्षक श्री. खाडे यांनी आभार मानले.



Publication of Souvenir : Chief Guest & other dignitaries

## ASPIRE -LBI

सूक्ष्म, मध्यम व लहु मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे कडून ASPIRE -LBI या प्रस्तावाचे दिल्ली येथे ६ मार्च रोजी सादरीकरण झाले होते. तो मंजूर होऊन इन्क्युबेशन सेंटरसाठी दहिवडी महाविद्यालयास १ कोटी रूपये अनुदान मंजूर झाले. मा. प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक डॉ. एम.जे लुबाळ यांनी काम पाहिले महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी प्राचार्य व समन्वयक यांचे अभिनंदन केले

## विजयकुमार विरकर यांस युवा गौरव पुरस्कार

दि. २ मार्च रोजी क्रीडा मंत्रालय भारत सरकारचा नेहरू युवा केंद्र, सातारा युवा गौरव पुरस्कार वाणिज्य विभागाचा विद्यार्थी विजयकुमार विरकर यांस सातारा येथील समारंभात प्रदान करण्यात आला.

संपादक - डॉ. के.एम.पवार

सदस्य - श्री.व्ही.एस.पाटोळे.
श्री. एस.आर. धोंगडे,
श्री. निलेश म्हेत्रे,
कु. ए.आर.हुलवान.

## महाविद्यालयास प्राप्त देणगी

| | |
|---|---|
| १. श्री. नामदेव कोंडीबा भोसले | १,००,०००/– |
| २. श्री. विजय माने | ७२,२८०/– |
| ३. वाढेश्वर प्रिटींग प्रेस | २५,०००/– |
| ४. श्री. विजयकुमार क्षिरसागर | २५,०००/– |
| ५. श्री. ए. आर. भिलवडे | ११,०००/– |
| ६. श्री. व्ही. एस. म्हस्के | ११,०००/– |
| ७. डॉ. विनय प्रकाश काळे | ५,५००/– |
| ८. डॉ. पी. आर. तळेकर | ५,०००/– |
| ९. श्री. तुकाराम म्हस्के | २,०००/– |
| १०. श्री. प्रतापराव भोसले | २,०००/– |
| ११. श्री. लक्ष्मण मोहिते | १,५००/– |
| १२. श्री. एस.एस. माने | १.२००/– |
| १३. श्री. व्ही. एस. खोटे | १,२००/– |
| १४. श्री. आनंद तपासे | १,०००/– |
| १५. सौ. वंदना जाधव | १,०००/– |
| १६. श्री. एस. एस. कांबळे | १,०००/– |
| | रूपये २,६५,६८०/– |

Supported By : I. Q. A. C.